# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## राज्यातील चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ नंतर भरणार; शासनाने काढला जीआर

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्यातील इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शाळा सकाळी नऊ नंतर भरवण्याच्या सूचना राज्य सरकारने सर्व शाळांना केले आहे. तशा प्रकारचा जीआर राज्य शासनाने काढला आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद कार्यालयामार्फत राज्यातील विविध शाळांच्या वेळा विचारात घेऊन शाळांची वेळ बदलण्याविषयी अभ्यास करण्यात आला. राज्यातील शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण प्रेमी, पालक आणि प्रशासनातील अधिकारी यांचे अभिप्राय यामार्फत नोंदवण्यात आले. त्यानुसार काही बाबी शिक्षण विभागाच्या समोर आल्या आहेत.

त्यानुसार, राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांपैकी काही शाळा विशेषतः खासजी शाळा भरण्याच्या वेळा या सकाळी सातनंतर आहेत. आधुनिक युगातील बदलेली जीवनशैली, मनोरंजनाची विविध साधने, शहरातील उशिरापर्यंत सुरू असलेल्या ध्वनिप्रदूषण उदा. वाहनांचा आवाज, विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने वाजविले जाणारे कर्कश संगीत इ. अशा अनेकविध कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपत आहेत आणि सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. ज्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे..


(वर्ष ६३ वे अंक ४९) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.०९ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# ठाकरे गटाचे अभिषेक घोसाळकरांची गोळ्या घालून हत्या

## मारेकरी मॉरिन नोरवानेही स्वत:ला संपवले

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची आज रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. गोळीबार करणाऱ्या व्यक्तीनेही स्वत:ला गोळी मारुन संपवले आहे. बोरिवली पश्चिममधील प्रभू उद्योग भवन कार्यालयात अभिषेक यांच्यावर गोळीबार करण्यात आला. पैश्याचा वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.




अभिषेक घोसाळकर हे ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार विनोद घोसाळकरांचे पुत्र आहेत. मॉरिस नोरोन्हा नावाच्या व्यक्तिकडून अभिषेक घोसाळकरांवर हल्ला करण्यात आला. घोसाळकरांच्या दिशेने पाच गोळ्या झाडण्यात आल्या, त्यापैकी तीन गोळया घोसाळकरांच्या शरिरात घुसल्या होत्या. गंभीर जखमी झालेल्या अभिषेक घोसाळकर यांना तातडीने (पान ४ वर)

# लोकसभेसाठी ठाकरे गटाचे उमेदवार निश्चित?

## छत्रपती संभाजीनगरात पुन्हा खैरे; वायव्य मुंबईत कीर्तिकरांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचा दावा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- एकीकडे महाविकास आघाडीमध्ये लोकसभा निवडणुकीसंबंधी जागावाटपाची चर्चा सुरू असताना शिवसेना ठाकरे गटाकडून महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ठाकरे गटाकडून विविध लोकसभा मतदार संघातील नऊ उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

विशेष करून शिंदेंच्या शिवसेनेत गेलेले खासदार गजानन कीर्तीकर यांच्या मुलाला म्हणजेच अमोल कीर्तिकरांना वायव्य मुंबईतून ठाकरे गटाने लोकसभेची उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत यांचं नाव अंतिम करण्यात आलं असून रत्नागिरी-सिंधुदुर्ग मधून विनायक राऊत तर छत्रपती संभाजीनगरमधून गेल्या वेळी पराभव झालेले चंद्रकांत खैरे यांच्या नावावरही शिक्कामोर्तब करण्यात असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

आगामी लोकसभा निवडणूक ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढवण्याचं शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि कॉंग्रेसने ठरवलं आहे. त्यासाठी जागावाटपाचीही चर्चा सुरू आहे. यामध्ये शिवसेना ठाकरे गटाने ४८ पैकी २३ जागांची मागणी केली आहे. या जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याआधीच शिवसेना ठाकरे गटाकडून ११ जागांवर नावं फायनल करण्यात आल्याची माहिती आहे.त्यामुळे लोकसभेसाठी ठाकरे गटाने आघाडी घेतल्याचं दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाकडून लोकसभेच्या उमेदवारीसाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामध्ये विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हेदेखील उत्सुक असल्याचं समोर आलं होतं. पण ठाकरे गटाकडून माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे नाव जवळपास निश्चित करण्यात आलं आहे. चंद्रकांत खैरे यांना गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत एमआयएमच्या इम्तियाज जलील यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता.

### आतापर्यंत शिक्कामोर्तब केलेले लोकसभा उमेदवार?

* शिर्डी - भाऊसाहेब वाकचौरे
* बुलढाणा - नरेंद्र खेडेकर
* ईशान्य मुंबई - संजय दिना पाटील
* रायगड - अनंत गीते
* रत्नागिरी-सिंधुदुर्ग - विनायक राऊत
* दक्षिण मुंबई - अरविंद सावंत
* वायव्य मुंबई - अमोल कीर्तीकर
* छत्रपती संभाजीनगर - चंद्रकांत खैरे
* धाराशिव - ओमराजे निंबाळकर
* परभणी - संजय जाधव
* ठाणे - राजन विचारे

# अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केली यूपीए काळातील अर्थव्यवस्थेचे वाभाडे काढणारी श्वेतपत्रिका

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज लोकसभेत श्वेतपत्रिका सादर केली. भारतीय अर्थव्यवस्थेशी संबंधित ही श्वेतपत्रिका आहे. १ फेब्रुवारी रोजी त्यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. त्यानंतर १० वर्षांच्या कार्यकाळात झालेल्या आर्थिक प्रगतीची श्वेतपत्रिका लोकसभेत सादर करण्यात आली. मी आज भारतीय अर्थव्यवस्थेची श्वेतपत्रिका हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये पटलावर ठेवते आहे असा उल्लेख त्यांनी केला. तसंच २०१४ च्या आधी देशाची अर्थव्यवस्था संकटात होती असाही उल्लेख श्वेतपत्रिकेत आहे.

ळईं चा दहा वर्षांचा कार्यकाळ नॉन परफॉर्मिंग होता असाही उल्लेख या श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे. या श्वेतपत्रिकेवर शुक्रवारी चर्चा होणार आहे. तसंच राज्यसभेत शनिवारी चर्चा होईल. श्वेत पत्रिकेद्वारे हे सांगण्यात आलं की २०१४ नंतर मोदी सरकारला कुठल्या आव्हानांचा सामना करावा लागला. तसंच या आव्हानांचा सामना करुन अर्थव्यवस्था कशी रुळावर आणली याचा उल्लेखही श्वेतपत्रिकेत उल्लेख आहे.

श्वेतपत्रिकेत उल्लेख आहे की यूपीएच्या काळात देशाचा आर्थिक पाया खिळखिळत केला. भारतात रुपया घसरला तोदेखील यूपीएच्या काळातच. २०१४ च्या आधी देशाच्या बँकिंग सेक्टरवर मोठं संकट आलं होतं. यूपीए सरकारने मिळालेल्या महसुलाचा चुकीचा वापर केला. असाही उल्लेख श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे.

तत्पूर्वी, कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदी सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळावर काळी पत्रिका प्रसिद्ध केली. ते म्हणाले की, भाजपने १० वर्षात ४११ विरोधी आमदारांना आपल्या बाजूने आणले. ते लोकशाही संपवत आहे. कॉंग्रेसने त्याला १० वर्षे अन्याय काल असे नाव दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत कॉंग्रेसच्या ब्लॅक पेपरवर निशाणा साधला. पंतप्रधान म्हणाले- गेल्या १० वर्षात सरकारने खूप विकास केला आहे. त्याला कुणाची नजर लागू नये म्हणून मी कॉंग्रेसच्या काळ्या कागदाला काळा टिका मानतो.

# राज्यात मविआला लोकसभेच्या ४८ पैकी २६ जागा मिळणार

## 'इंडिया टुडे मूड ऑफ नेशन'च्या सर्व्हेचा अंदाज

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात महायुतीकडून अब की बार ४५ पार असा नारा देण्यात येत असला, तरी परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत महायुती विरुद्द महाविकास आघाडी असाच सामना रंगणार आहे. या पार्श्वभूमीवर मूड ऑफ द नेशन सर्वेक्षणात महाराष्ट्रातील धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. सर्वेक्षणात महाविकास आघाडीने भाजप-शिंदे-अजित पवार गटावर मात केल्याचे दिसत असून विरोधी आघाडीला ४८ पैकी २६ जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भाजप महायुतीला ४०.५ टक्के मते, तर कॉंग्रेस आघाडीला ४४.५ टक्के मते मिळत असल्याचे दिसत आहे.

सर्वेक्षणानुसार, आज भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) यांची युती एकत्र निवडणूक लढवल्यास त्यांना ४०.५ टक्के मते मिळतील.

मूड ऑफ द नेशन सर्वेक्षणात लोकसभेला महाराष्ट्रात ४८ पैकी भाजपला २२ जागा, कॉंग्रेसला १२ जागा, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) १४ जागा मिळतात. शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित गट) यांना ६ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकत्र येऊन भाजपला विशेष फायदा होताना दिसत नाही. भाजप महायुतीला ४०.५ टक्के, कॉंग्रेसच्या महाविकास आघाडीला ४४.५ टक्के तर इतरांना १५ टक्के मते मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## रेपो रेट 'जैसे थे'

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- आरबीआयकडून पतधोरण जाहीर करण्यात आले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात महागाई दर ५ टक्क्यांच्या वर राहणार असल्याची माहिती आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी दिली आहे. आरबीआयकडून सलग सहाव्यांदा रेपो रेट जैसे थे ठेवण्यात आले आहेत. आरबीआयकडून रेपो रेट ६.५ टक्क्यांवर कायम आहे. त्यामुळं सर्वसामान्यांना व्याजदरात कोणताही दिलासा मिळालेला नाही. डिसेंबर २०२३ मध्ये महागाई दरात मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. डिसेंबर महिन्यात महागाई थेट ५.६९ टक्क्यांवर गेली होती. खाद्य किंमतीत वाढ झाल्यानं महागाईत वाढ झाल्याची माहिती आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी दिली.

# ठाकरे गटाचे रवींद्र वायकर शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का दिला आहे. उद्धव ठाकरे यांच्याशी कौटुंबीक संबंध असलेले नेते आणि आमदार रवींद्र वायकर हे शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यामुळे ठाकरेंच्या बालेकिल्ल्याला खिंडार पडणार आहे. रवींद्र वायकर हे जोगेश्वरी पूर्व मतदारसंघाचे आमदार आहेत. रवींद्र वायकर हे लवकरच शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असून सर्व नगरसेवक, शाखा प्रमुख, विभाग प्रमुखांना तयारीत राहण्याचे आदेश दिल्याची सूत्रांची माहिती आहे.

रवींद्र वायकर यांच्यावर जोगेश्वरीतील कथित घोटाळ्याचे आरोप आहेत. त्यांची ईडीची चौकशीही सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आजच ट्विट करुन, रवींद्र वायकर यांना ईडी धमकावत असल्याचं म्हटलं होतं. तसंच रवींद्र वायकर यांना शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी दबाव असल्याचं राऊतांनी म्हटलं होतं.

जोगेश्वरी भूखंड घोटाळाप्रकरणी ईडीच्या रडारवर असलेले ठाकरे गटाचे आमदार आणि उद्धव ठाकरे यांचे विश्वासू सहकारी रवींद्र वायकर हे लवकरच शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटातील आणखी एक आमदार शिंदेंच्या (पान ४ वर)

# ...म्हणून राजीनामा दिल्याचे जाहीर केले; भुजबळांचा खुलासा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी राजीनामा दिल्याचं जाहीर केल्यानंतर राज्यभरात गदारोळ निर्माण झाला. तसंच, हा राजीनामा स्वीकारला नसल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं. राजीनामा दिल्यानंतर याची वाच्यता कुठेही करू नका असं सरकारकडून सांगण्यात आल्यानंतरही छगन भुजबळांनी जाहीर व्यासपीठावरून राजीनामा दिल्याचे जाहीर केले. ही वेळ त्यांच्यावर का आली? याबाबत छगन भुजबळांनी आज माध्यमांशी बोलताना खुलासा केला आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, कोणत्याही पक्षाने माझा राजीनामा मागितला नव्हता. पण मला वाटत होतं की मी ओबीसी एल्गार सभेला जातोय, तर मला सरकारविरोधात बोलावं लागेल. त्यामुळे मी राजीनामा दिला. परंतु, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री म्हणाले की राजीनामा दिल्याची गोष्ट बाहेर (पान ४ वर)

# मला मंडल आयोगाला चॅलेंज करायचे नाही, भुजबळांना समजावून सांगा-जरांगे

नाशिक दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्यात शाब्दिक युद्ध सुरूच आहे. खरा पाटील असशील तर मंडल आयोग संपवून दाखव असं आव्हान छगन भुजबळांनी दिलं होतं. आता भुजबळांच्या या आव्हानाला जरांगे यांनी नाशिकमधून प्रत्युत्तर दिलंय. माझ्या नादाला लागू नकोस, मला मंडल आयोगाला चॅलेंज करायचं नाही, भुजबळांना हे समजावून सांगा असं जरांगे यांनी म्हटलंय.

सगेसोयरे अध्यादेशाचं कायद्यात रुपांतर व्हावं यासाठी १० फेब्रुवारीपासून जरांगे आमरण उपोषण करणार, भुजबळांमुळे आम्हाला मंडल आयोगाला चॅलेंज करावं लागेल असा इशारा मनोज जरांगेंनी दिला होता. त्यानंतर भुजबळांनी त्यावर जरांगेंना आव्हान दिलं होतं. मंडल आयोग हा ओबीसी आरक्षणाचा निर्माता, खरा पाटील असशील तर मंडल आयोग संपवून दाखव असं आव्हान राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना दिलं होतं. त्यावर जरांगे यांनी आता प्रत्युत्तर दिलं. मनोज जरांगे म्हणाले की, तुला पुन्हा सांगतो माझ्या नादी लागू नको, मंडल कमिशन जाईल. ओबीसी बांधवांना सांगतो, मला मंडल कमीशनला चॅलेंज करायचे नाही, त्याला समजावून सांगा.

भुजबळांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले (पान ४ वर)

# नरेंद्र मोदी जन्माने ओबीसी नाहीत, राहुल गांधी यांचा दावा

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधताना, त्यांच्या जातीचा उल्लेख केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जन्माने ओबीसी नाहीत, त्यांचा जन्म ओबीसीमध्ये झाला नाही. ते गुजरातमधील तेली समाजात जन्माला आले. भाजपने २००० साली या समाजाला ओबीसीचा दर्जा दिला, असा दावा राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा आज ओदिशामध्ये



पोहोचली. यावेळी बोलताना राहुल गांधींनी मोदींवर हल्लाबोल केला.

राहुल गांधी म्हणाले, 'सर्वात आधी मला हे सांगावं लागेल की पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जन्मजात ओबीसी नाहीत. नरेंद्र मोदी हे गुजरातमधील तेली समाजात (पान ४ वर)

# पक्ष चोराचोरीत दंग असलेल्या महायुती सरकारला शेतकऱ्यांचा विसर-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- सोयाबीनची खरेदी जागतिक बाजार पेठेवर आधारित असल्याचे सांगितले जात असले तरी केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने खरेदी केली जाऊ नये, असे अपेक्षित आहे. परंतू सोयाबीन असो की, इतर पीकांची खरेदी व्यापाऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने केली जात आहे. पण पक्ष चोराचोरीत दंग असलेल्या महायुती सरकारला शेतकऱ्यांचा विसर पडला आहे,



अशी परखड टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर केली आहे.

दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेता यापुढे सोयाबीन पिकांची खरेदी केंद्रे सुरु करुन सरकारने सोयाबीनची हमी भावाने खरेदी करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, लोकांसाठी सत्ता आणि संपत्ती सर्वोच्च आहे. ते सत्तेसाठी ( पक्ष सोडून ) गेलेले आहेत. यांना काही विचार नाही, आयडॉलॉजी नाही, लोकांचं हित नाही. अधिकाधिक काय मिळवता येईल, हा उद्देश ठेवून ही मंडळी फुटलेली आहेत. चौकशीच्या (पान ४ वर)

## राज्यसभेसाठी भाजपच्या नेत्यांच्या नावाची यादी दिल्लीत पोहचली

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- येत्या २७ फेब्रुवारी रोजी राज्यसभेसाठी निवडणूक पार पडणार असून, यात महाराष्ट्रातील सहा जागांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यातील पाच जागा महायुतीच्या वाट्याला येण्याची शक्यता वर्तवली जात. या पाच जागांपैकी तीन जागा भाजपच्या वाट्याला येणार आहेत. अशात भाजपकडून राज्यसभेसाठी ९ उमेदवारांच्या नावाची यादी समोर येत असून, ती दिल्लीला पाठवण्यात (पान ४ वर)

# राज्य सरकारने १५ फेब्रुवारी रोजी बोलावले विशेष अधिवेशन

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- येत्या १५ फेब्रुवारी रोजी मराठा आरक्षणासाठी विधिमंडळाचे विशेष आधिवेशन बोलवण्यात आले आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणासंदर्भात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

कुणबीतील सगेसोयऱ्यांना प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने काढलेली अधिसूचना आणि मागासवर्ग आयोगाचा अहवाल या दोन्ही महत्त्वाच्या मुद्यांवर या अधिवेशनात चर्चा होणार आहे. त्यामुळे या अधिवेशातून मराठा सामाजाला आरक्षण मिळणार का याकडे राज्याचे लक्ष असणार आहे.

मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. तर मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण द्यावे ही मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी लावून धरली आहे. त्यासाठी त्यांनी अंतरवाली सराटी ते मुंबई असा महामोर्चाही काढला होता.

# निरोगी शरीरासाठी नियमित व्यायाम गरजेचा

जसे वाढत्या वयाचा परिणाम केवळ चेहऱ्यावरच नव्हे तर शरीराच्या इतर भागावरही दिसू लागतो. यात वेगळे असे काहीही नाही, ते पूर्णपणे नैसर्गिक आहे. काही लोक म्हणतील, मला त्याची पर्वा नाही आणि काही लोक असा युक्तिवाद करू शकतात की, हे पूर्णपणे नैसर्गिक आहे, याबद्दल काहीही केले जाऊ शकत नाही. पण काही लोक हे सत्य स्वीकारतील आणि म्हणतील, 'होय, मला याची काळजी आहे आणि तंदुरुस्त राहण्याचा आणि माझ्या वयापेक्षा तरुण दिसण्याचा कोणता मार्ग आहे का? माझा ठाम विश्वास आहे की, जे लोक त्यांच्या वयापेक्षा चांगले आणि तरुण दिसण्याचा प्रयत्न करतात ते सामान्यतः सकारात्मक, महत्त्वाकांक्षी आणि उत्साही असतात. लोकांच्या या गटाला 'आनंदी आणि शांत' म्हणायला हवे.

वयाची चाळिशी, पन्नाशी आणि त्याहून अधिक झाल्यावर त्याचा परिणाम चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसू लागतो. स्नायू कमकुवत होऊ लागतात. अगदी सतर्कता, ताकद आणि चपळताही कमी होते. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण 'आनंदी आणि शांत' प्रकारचे लोक हे मान्य करत नाहीत. त्यांना ही वृद्धत्वाची प्रक्रिया शक्य तितकी कमी करायची असते किंवा वृद्धत्वाचे परिणाम आणि कारणे कमी करायची असतात. औषधाच्या अनेक प्रणाली, विशेषतः पारंपरिक औषध, वृद्धत्वाचा प्रभाव कमी करण्यासाठी टिप देतात. यामध्ये योग आणि ध्यान हे उल्लेखनीय आहेत. खरं तर, या विषयावर इतर अनेक शिफारस केलेले पर्याय/पद्धती आहेत ज्याबद्दल नेटवर वाचता येते. असे असूनही गुरुत्वाकर्षण, मेंदू आणि नलिका ही संकल्पना अद्भुत आणि फायदेशीर आहे.

तुम्ही गुरुत्वाकर्षणाच्या अधीन आहात हे साधे सत्य तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे. तुमच्यावर गुरुत्वाकर्षण सतत कार्यरत असते. गुरुत्वाकर्षण सर्व काही पृथ्वीकडे खेचते आणि तुमचे शरीर त्याला अपवाद नाही. गुरुत्वाकर्षणाची खालची शक्ती तुमची त्वचा आणि स्नायू सैल करते, मग ती तुमच्या कपाळावरची त्वचा असो, डोळ्यांखाली, गाल किंवा स्नायू असो. त्याचे तीन परिणाम दिसून येतात. सुरकुत्या, चेहऱ्याच्या स्नायूंमध्ये शिथिलता आणि शरीराच्या स्नायूंमध्ये अशक्तपण. त्यामुळे वयानुसार तुमचा चेहराही बदलू लागतो. साहजिकच, मोठ्या वयात तुमच्यावर गुरुत्वाकर्षण अधिक वर्षे कार्य करत असल्याने तुमच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर तरुणांपेक्षा जास्त परिणाम होतो आणि परिणामी तुमच्या शक्तीवरही विपरीत परिणाम होतो.

खरं तर समस्येचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा भाग ओळखल्यानंतर आणि परिभाषित केल्यानंतर आपल्याला गुरुत्वाकर्षणामुळे वृद्धत्वाचा घटक संबोधित करणे आवश्यक आहे. येथे काही विचार आहेत ज्यांचा तुम्हाला विचार करणे आवश्यक आहे. व्यायामाच्या कमतरतेमुळे स्नायू शोषून जातात आणि तुमच्या विचारापेक्षा लवकर कमकुवत होतात. व्यायामामुळे विश्रांतीच्या या प्रक्रियेचा सामना करण्यास मदत होते. कारण व्यायामामुळे रक्ताचे परिसंचरण वाढते आणि तुमचे स्नायू तंदुरुस्त, कडक आणि बळकट राहतात. त्यामुळे तुमचे हृदय तंदुरुस्त ठेवले जाते. तुमच्या मेंदूला ऑक्सिजन पुरवला जातो. तुमची तणाव पातळी कमी करण्यास मदत करतो आणि एंडोर्फिन, डोपामाइन सारखी निरोगी रसायने तयार करतो.

स्वत:ला निरोगी आणि बळकट ठेवण्यासाठी तुम्ही नियमित व्यायाम करावा. तुम्ही लहानपणापासूनच व्यायाम करायला सुरुवात केली तरी चालेल. पण जर तुम्ही व्यायाम केला नसेल तर काळजी करू नका, तुम्ही आता पण सुरू करू शकता. एकदा तुम्ही पन्नाशी ओलांडली की, तुमच्या शरीराच्या रचनेनुसार थोडा वेग कमी करा, पण सातत्य राखा. फिटनेस हा एक प्रवास आहे, हे लक्षात ठेवा. माझ्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे, मी सुचवू शकतो की, चाळिशीनंतर आदर्शपणे, तुम्ही दर आठवड्याला सुमारे २४० ते ३०० मिनिटे जोमाने व्यायाम करू शकता आणि पन्नासीनंतर, हा कालावधी दर आठवड्याला २०० ते २४० मिनिटे असावा. व्यायामाची ही मिनिटे अंदाजे ४ ते ५ दिवस किंवा आठवडे विभागली पाहिजेत.

तुमच्या शरीराला किती झोपेची गरज आहे, हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. तुमच्या दैनंदिन नित्यक्रमात तुम्हाला किती तासांची झोप मिळेल याची खात्री करा.

मी स्वतः रोज ७ ते ८ तास झोपतो आणि प्रत्येकाला तितकेच झोपण्याची शिफारस करतो. काही अपवाद ठीक आहेत, जोपर्यंत ते फक्त अपवाद आहेत, त्यामुळे तुम्ही तुमच्या वाढदिवसाला किंवा नवीन वर्षाच्या दिवशी उशिरापर्यंत जागे राहिल्यास काळजी करू नका. तसेच, जेव्हा शक्य असेल तेव्हा दुपारी २० मिनिटे डुलकी घेण्याचा प्रयत्न करा. याने तुमचे स्नायू आणि मनाला आराम मिळण्यास खूप मदत होते. जर तुमच्या कामात नियमित प्रवासाचा समावेश असेल, तर तुम्हाला झोपेच्या कमतरतेचा त्रास होणे स्वाभाविक आहे. त्याची जास्त काळजी करू नका. प्रवास करताना तुम्हाला दररोज किती झोप येते हे लक्षात ठेवा. या तत्त्वाचा तिसरा आणि तितकाच महत्त्वाचा भाग म्हणजे बहुतेकवेळा निरोगी, संतुलित आणि पौष्टिक आहार घेणे आवश्यक आहे.

आपल्या स्वत:च्या विवेकबुद्धीचा वापर करा किंवा निरोगी आहारासाठी एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घ्या; परंतु मी शरीरासाठी पुरेशी प्रथिने आणि हाडांसाठी कॅल्शियमची शिफारस करतो. पूरक आहार शरीराला उपयुक्त आहे. आवश्यक असल्यास ते घेतले पाहिजे. तुम्हाला काही शंका असल्यास, डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या. थोडक्यात, 'चांगला व्यायाम, चांगली झोप आणि चांगला आहार' नियमित घ्या. तुमच्या शरीरावर गुरुत्वाकर्षणाचा नकारात्मक प्रभाव कमी करण्याची ही गुरुकिल्ली आहे. तुमचा मेंदू तुम्ही कसे दिसता यात महत्त्वाची भूमिका बजावतो. तुम्ही विचार करता तितके तरुण दिसता, फक्त तुमचे वय वाढत आहे, याचा अर्थ असा नाही की तुम्ही स्वतःला म्हातारे समजू लागा आणि निस्तेज व्हा. तुमचे वय काहीही असो, तुम्ही निरोगी शरीर आणि मानसिक मेक-अपद्वारे तुमचे व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास वाढवू शकता. तुम्ही तुमच्या वयापेक्षा एक दशक लहान दिसण्याचा आणि अनुभवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सकाळी आणि संध्याकाळी १५ मिनिटे ध्यान करणे चांगले असते. तुम्ही हे घरी किंवा इतर कोठेही करू शकता, तथापि ध्यान करताना आपण विचलित होणार नाही याची काळजी घ्या. साहजिकच, ध्यान करताना तुम्ही तुमचा सेल फोन दूर ठेवावा किंवा सायलेंट ठेवा. ध्यान करताना विचारहीन अवस्थेत राहण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला मानसिकदृष्ट्या निरोगी आणि आत्म-प्रेरित ठेवण्यासाठी सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. माझ्या मते, सकारात्मक विचार म्हणजे आनंदी चेहरा ठेवणे, हसणे आणि नेहमी चांगल्या मूडमध्ये असल्याचे भासवणे असा नाही; परंतु 'प्रत्येक समस्येवर उपाय आहे' आणि 'तो उपाय शोधणे शक्य आहे' हे जाणून घेणे.

# विद्यार्थ्यांवर 'असर' नेमका कशाचा?



**भारतीय** युवकांच्या मनावर डिजिटल माध्यमांनी गारूड केले असून, त्याचा शैक्षणिक प्रगतीवर वाईट परिणाम होताना दिसून येतो अशी ओरड सध्या ऐकायला मिळते. कारण 'असर' संस्थेच्या सर्वेक्षणातून हे सत्य समोर आले आहे की, आजही देशात ग्रामीण भागातील ८ वी ९ वीच्या अनेक मुलांना नीट लिहिता — वाचता देखील येत नाही. 'असर'च्या या संशोधनातून शिक्षणावर होणारे अनेक 'असर' म्हणजे 'परिणाम' किंवा 'प्रभाव'अधोरेखीत होतात. त्यांची व्याप्ती खूप मोठी आहे. मग या मुलांच्या प्रगतीवर नेमका कशाचा 'असर' झालाय याचे कुतूहल प्रत्येकाच्या मनात आहे.

'असर' या संस्थेने भारतातील ग्रामीण भागांमधील १४ ते १८ वर्षांच्या युवकांवर लक्ष केंद्रित करून केलेल्या २०२३च्या सर्वेक्षणात सुमारे २५ टक्के युवकांना आपल्या मातृभाषेतील इयत्ता दुसरीच्या पुस्तकातील धडा वाचता येत नव्हता. ही बाब आधुनिक भारताच्या प्रगतीला निश्चितच मारक आहे. डिजिटल युगात प्रगतीच्या वारूवर स्वार होताना मातृभाषेतून चार ओळी वाचता येऊ नये, असे असताना दुसरीकडे मात्र अनेक शाळांमध्ये रोबोटिक्स आणि कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाते आहे. विद्यार्थ्यांची कार्यकुशलता वाढविण्यावर भर दिला जात आहे. एकूण हा अहवाल आल्यानंतर आपल्या शिक्षण व्यवस्थेचे चांगलेच वाभाडे निघाले. त्यानंतर काही दिवसांतच राज्य सरकारने नवे धोरण आखले.

शाळांच्या अचानक भेटी दरम्यान जर विद्यार्थी कमकुवत आढळला, तर त्याची जबाबदारी आता शिक्षकांवर असेल, ज्या शिक्षकांच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्त कमी आढळून येईल, अशा शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवण्याच्या सूचना राज्य सरकारने केल्या आहेत. या भेटीचा आढावा दर महिन्याला घ्यावा लागणार आहे. तसेच केंद्र प्रमुखांना अचानक भेटी देण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. 'असर'च्या सर्वेक्षणात राज्यातील नांदेड ग्रामीणमधील ६० गावांतील १,३७४ युवकांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये कृती, कौशल्य, मूलभूत क्षमता तसेच डिजिटल साक्षरता व कौशल्य हे प्रमुख निकष ठेवण्यात आले होते. यामध्ये भूलभूत कौशल्य व डिजिटल साक्षरतेमध्ये राज्याची कामगिरी निराशाजनक आढळली होती; परंतु ही निराशा आत्ताचीची आहे असे नाही. अनेक दशकांपासूनचा हा प्रश्न आजही कायम आहे. कारण शिकणे आणि शिकवणे याचा समन्वय साधण्यासाठी मुलांना शिकण्याची आवड असावी लागते. तसेच सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, भौगोलिक बाबींचाही संबंध यामध्ये येतो. शाळेतील वातावरण, शिक्षक आणि संस्थांची धोरणे, सरकारी नियम देखील याला कारणीभूत ठरतात. मधल्या काही काळात तर ग्रामीण शिक्षकांवर शाळाबाह्य कामांचे ओझे देखील होते. त्याचा साहजिकच शिकवण्यावर परिणाम होत होता हे विसरून चालणार नाही. आता तर महाराष्ट्रात अनेक जिल्हा परिषदांच्या शाळा एक शिक्षकी बनल्या आहेत. एकच शिक्षक १ ली ते चौथीपर्यंत वर्ग शिकवतो. तसेच अनेक शाळा दुर्गम भागात आहेत, तर अनेक शाळा मोडकळीस आल्या आहेत, तर काही पावसाळ्यात शाळा गळतात देखील, या सगळ्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो हे दुर्लक्षून चालणार नाही.

'असर' संस्थेचा शैक्षणिक रिपोर्ट प्रासार माध्यमांनी दाखवला आणि आपली मराठी शाळा आठवली. कारण या बातमीनंतर मन भूतकाळात डोकावू लागले. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' ही पूर्वीची एक म्हण यानिमित्ताने आठवली. आता तर शिक्षकांच्या हातातली ती छडी गायब झाली आहे. काही वर्षांपासून पालकांनी केलेल्या तक्रारीमुळे शिक्षकांना धड रागावताही येत नाही. तसा कायदा तयार करण्यात आला आहे. कारण काही आगावू शिक्षकांनी लेकरांना बेदम मारहाण केली. काहींनी तर अक्षरश: मुलांना बदडूनही काढले. त्याच्यांमुळे शिक्षकांच्या अनावर रागावर नियंत्रण आले खरे; पण मुलं आता कुणालाच दाद देईनाशी झाली आहेत. त्यातच मुलांची घोकंपट्टीही कमी झाली आहे.

काही वर्षांपूर्वी राज्यातल्या कोणत्याही शाळेच्या बाजूच्या रस्त्यांनी जाताना येणारा बे.. एके बेष्ठ, अष्ठ अष्ठ रे अननसातलाष्ठ ए फॉर ?पलष्ठ बी फॉर बॉलष्ठ ही एकसुरातली मोठ्या आवाजातली उजळणी आणि बाराखडी ऐकू यायची. ते एकसुरातले सूर आता फारसे ऐकू येत नाहीत. फार पूर्वीच्या काळात पावकी, निमकी, आडीचकी होती, ती तर पाच दशकांपूर्वीच नामशेष झाली. त्यावेळचे शिक्षक याची घोकंपट्टी करून घ्यायचे. आता घोकंपट्टीही बंद झाली अन् मुलांची बोटांवरची आकडेमोडही संपत गेली. कारण कॅल्क्युलेटरचा जमाना आला आणि त्याच्यावर गृहपाठही होऊ लागला. गणितं सोडवणे सोप्पे झाले. आता मोबाइलमुळे सगळे जग नजरेसामोर आले. त्यामुळे लक्षात ठेवण्यासाठी मेंदूला ताण द्यायची गरज उरली नाही. किंबहुना तो ताण आता कोणालाही नकोसा आहे.

शिक्षकांनी मुलांना छडीचे फटके मारावे या मताशी मीच काय कोणीही सहमत होणार नाही; परंतु मुलांना शिक्षकांचा धाक असणे गरजेचे आहे. पूर्वी शिक्षकांचा धाक होता. त्याचे रागावणेही नाटकी नव्हते. कारण धपाटा मारणारे गुरूजी आणि बाईंचे हात पाठीवर कौतुकाची थाप देखील मारायचे, त्यातून एक भावनिक बंध तयार व्हायचा. हेच त्यावेळच्या शाळांच्या यशाचे गमक होते. शाळा अगदी साध्या होत्या. कॉन्व्हेंटमधली मुले देखील फार चुणचुणीत असायची. काळाच्या ओघात विद्यार्थी आणि शिक्षकांमधला भावबंध आणि शिक्षक पालकांमधला बंध तुटत गेला. त्यामुळेच नकळतपणे शिक्षण व्यवस्थेचा तोलही सुटत गेला. त्याला कारण शिक्षणाचे उदात्तीकरण होऊन त्याचे व्यापारीकरण झाले. शासनाच्या शाळांमध्ये देखील आमूलाग्र बदल होत गेले. गुरूजी आणि बाईंच्या जागी सर आणि मॅडम आणि मिस आले. ज्ञानार्जनात भावनिक पोकळी निर्माण झाली. ती कधीही भरून निघणारी नाही.

काही दशकांपूर्वी मॅट्रिक पास झालेली व्यक्ती खूपच ज्ञानी, असा समज होता. त्याला सहज नोकरी देखील मिळत असे कारण त्याचे मराठी, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत देखील उत्तम असे, आता मातृभाषा नीट वाचता येत नाही, इंग्रजी कळतं म्हणतात, पण इंग्रजी शब्दाला मराठीत काय म्हणतात ते नीट सांगता येत नाही. दुसरे असे की, शाळेत जाऊनही मुलांना पुन्हा खासगी शिकवणीला पाठवावे लागते. तरच चांगले मार्क मिळतात. चांगली ग्रेड मिळते. मग मुले शाळेत काय शिकतात? हा प्रश्न निर्माण होतो. नुसता अभ्यास आणि अभ्यास, तरीही अनेकदा नापास. उरलेल्या वेळात मुलांच्या हातात आसतो तो मोबाइल, आपली मुले टेक्नोसेव्ही झाल्याचा आताच्या पालकांना खूप अभिमान वाटतो. मोबाइलमध्ये गुंतलेल्या मुलांना खाण्यापिण्याचे भान नसते. गेम आणि फास्टफूडच्या आहारी गेलेली मुलं, हट्टी बनत चालली आहेत. त्यांना काळाचे वेळेचे भान नाही. कारण हे भान मुळातच त्यांचे पालकही हरवत चालले आहेत. अख्खं कुटुंब फावल्या वेळात मोबाइलमध्ये व्यस्त असल्यामुळे मुलांचा अभ्यास घेणार कोण? आई की बाबा हाच खरा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या आता त्रिकोणी नाहीतर चौकोनी कुटुंब असल्याने घरात शिकवायला मोठी भावंडे, आत्या, काका, आजी, अजोबा देखील नाहीत.

शहरांत खेळाची मैदाने कमी असतात; परंतु ग्रामीण मुलांना खेळण्यासाठी जागेचा अभाव नाही. पण आता ग्रामीण भागातील मुलांना खेळण्याची हौस दिसत नाही. त्यामुळे त्यांचा उत्साह कमी होत चालला आहे. अगदी कमी वयात डोळ्याला चष्मा लागतो आहे. गुटगुटीत बाळे आता लठ्ठ दिसत आहेत. मुलांमध्ये चीडचीडपणा वाढत चालला आहे. मग ती मुले शहरातील असोत की खेड्यातील; कमी अधिक फरकाने अनेक गोष्टींमध्ये साम्य आहे. 'ॲन्युअल स्टेट्स ऑफ एज्युकेशनल रिपोर्ट' अर्थात असरच्या २०२३ च्या 'बियॉन्ड बेसिक्स' रिपोर्टमध्ये ग्रामीण भागामधील १४ ते १८ वर्षांच्या युवकांवर लक्ष केंद्रित केले. या अहवालानुसार केवळ ५.६ टक्के युवक व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. २००५ पासून सुरू झालेल्या या अहवालानुसार अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशभरातील २६ राज्यांमधील २८ जिल्ह्यांतील १४ ते १८ वर्षे वयोगटातील ३४ हजार ७४५ तरुणांशी संवाद साधून हा अहवाल तयार केला. त्यात प्रत्येक राज्यांमधील एका ग्रामीण जिल्ह्याचे सर्वेक्षण केले गेले. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील दोन जिल्ह्यांची निवड सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. सुमारे २५ टक्के युवकांना आपल्या मातृभाषेतील इयत्ता दुसरीच्या पुस्तकातील धडा वाचता येत नाही. अर्ध्यापेक्षा जास्त युवक १ ते ३ अंकापर्यंतच्या प्रश्नांचे उत्तर देऊ शकले नाहीत. केवळ ४३ टक्के युवकांनी बरोबर उत्तरे दिली. यामध्ये इयत्ता तिसरी ते चौथीच्या वर्गातील प्रश्नांवर या युवकांशी संवाद साधण्यात आला. अर्ध्यापेक्षा अधिक युवकांनी इंग्रजी भाषेतील वाक्य वाचली. तीन चतुर्थांश युवकांना त्याचा अर्थ सांगता आला. मुलांच्या तुलनेत मुली आपल्या क्षेत्रीय भाषेतील इयत्ता दुसरीचा धडा चांगल्या पद्धतीने वाचला. गणित आणि इंग्रजीमध्ये मुलींच्या तुलनेत मुले अधिक चांगल्या पद्धतीने प्रदर्शन करत असल्याचे दिसून आले. सर्वेक्षण अहवालानुसार ९० टक्के युवकांच्या घरी स्मार्टफोन आहे. त्यातील सर्व युवक स्मार्टफोनचा वापर करू शकतात. त्यातही मुलींच्या तुलनेत मुलांकडे स्वतःचा स्मार्टफोन आहे. सुमारे ८० टक्के युवकांनी केवळ चित्रपट पाहण्यासाठी, गाणे ऐकण्यासाठी म्हणजेच मनोरंजनासाठी स्मार्टफोनचा उपयोग केला.

**- रूपाली केळस्कर**

# इतिहास घडविणारे कामगार नेते रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे

**आजच्या** बहुसंख्य कामगारांना आणि कामगार नेत्यांना कामगार चळवळीचा संघर्ष मय इतिहास माहिती नाही. रविवारची सुट्टी सर्वच घेतात. काशी मिळाली हेच माहिती नाही,वेळेवर पगार आठ तास दिवटी नंतर वर टाईम्स कोणामुळे मिळतो हा इतिहास वाचला पाहिजे तरच कामगारांना स्वताचे रक्षण करता येईल. अन्यता असंघटित कामगारांची गुलाम फौज तयार होईल. देश सध्या त्याच वाटेने मार्गक्रमण करतांना दिसत आहे. भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबाहदूर नारायण मेघाजी लोखंडे वाचा आणि जागरुतेचा विस्तव विझु देऊ नका.

रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे (जन्म १३ ऑगस्ट, १८४८, मृत्यू ९ फेब्रुवारी, १८९७ ) हे एक भारतीय कामगार पुढारी होते.नारायण मेघाजीं लोखंडे यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) जवळचे कन्हेरसर होते. ते माळी समाजाचे शेतकरी कुटुंबात जन्मले होते. त्यांनी गरीब परिस्थितीतून माध्यमिक शिक्षण पुरे केले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर, लोखंडे यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली होती. तेथे त्यांना कामगार दहशतीच्या वातावरणात काम करतांना दिसले. दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार पाहिले. त्यांना आठवडयाची सुटीही मिळत नसे,वेळेवर पगार मिळत नव्हता तेव्हा त्यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले. त्यांनी बॉबे मिल हंड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली. ही कामगार संघटना भारतातील संघटित कामगार चळवळीची सुरुवात मानली जाते. भारतातील स्वाभिमानी कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मेघाजी लोखंडे ओळखले जातात. ते महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज मुंबई शाखेचे अध्यक्षही होते. तसेच सत्यशोधक चळवळीतली त्यांची कामगिरीही लक्षवेधी व महत्त्वपूर्ण मानली जाते. मुंबईत १८९६ मध्ये प्लेगची मोठी साथ उसळली. या साथीत अनेक लोक मृत्युमुखी पडले. त्यावेळी नारायण मेंघाजी लोखंडे पुढाकार घेऊन सरकारी मदतीने प्लेगग्रस्तांसाठी एक 'मराठा इस्पितळ' काढले होते. परंतु दुर्देवाने लोखंडे यांनाच प्लेगने पछाडले व त्यातच त्यांचा ९ फेब्रुवारी,१८९७ अंत झाला. असे इतिहास घडविणारे कामगार नेते रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे होते. त्यावेळची कामगार चळवळ आणि आजची कामगार चळवळ मोठा फरक आहे.

भारतात आज कामगार संघटना ट्रेड युनियन राजकीय पक्षाच्या बटीक झाल्या आहेत. त्यामुळे भांडवलदार मालक वर्ग राजकीय पक्षाला भरपूर निवडणूक निधी देऊन नेत्यांनाच विकत घेत आहेत. म्हणुन सर्वच क्षेत्रातील संघटीत कामगारांचे जिंवन उध्वस्त झाले आणि होत आहे. भांडवलदार आणि उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून असंघटीत



कष्टकरी कामगार, मजुर, शेतमजुरनां मुक्त व्हायचे असेल तर त्यांनी सर्व प्रथम स्वबळावर संघटीत झाले पाहिजे. राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली संघटीत झाल्यामुळे आज कामगार,कर्मचारी देशोधडीला लागले आहेत. हे कोणी नाकारू शकत नाही. सेवा निवृत्त झालेल्या कामगारांच्या रिकाम्या जागा न भरता ठेकेदारी पद्धत सुरु होण्यास संघटीत कामगारांच्या ट्रेड युनियन जबाबदार आहेत. म्हणुन सर्वच क्षेत्रात ठेकेदारी पद्धतीने असंघटीत कामगारांचे शोषण मोठया प्रमाणात होत आहे. जे काम कायम स्वरूपी चालते,असते त्या कामासाठी ठेकेदारी देण्याचा प्रश्नच येत नाही.ते काम ठेकेदारी वर देणे म्हणजे भांडवलशाही आणि ब्राह्मणशाहीचे उघड समर्थन करणे होय!. यालाच महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली रावबहादुर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी विरोध करून देशव्यापी संप घडवुन आणला होता. हे आजच्या सर्व ट्रेड युनियन चालविणारे नेते विसरले आहेत. कारण आजच्या ट्रेड युनियन मनुवादी, हिंदुत्ववादी विचाराचे खंबीर समर्थक आहेत. त्यांना कामगार कर्मचाऱ्यात समानता नको आहे. तर मनुवादी जातीची विषमता म्हणजेच जातीव्यवस्थाच हवी आहे. यालाच बहुसंख्य पुरोगामी समाजवादी, आंबेडकरवादी कामगार कर्मचारी साथ देतात. यांचे जिवंत उदाहरण म्हणजे सर्वात मोठे कामगार कर्मचारी असलेलं सार्वजनिक क्षेत्र रेल्वे उधोग धंद्यामधील नॅशनल रेल्वे मजदूर युनियन (NRMU) आणि सेंट्रल रेल्वे मजदूर संघ (CRMS). यात बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय कामगार कर्मचारी अधिकृत सभासद आहेत.त्यांना १२ व १३ फेब्रुवारी १९३८ मनमाड येथे रेल्वे गॅंगमन कामगारांच्या दोनदिवशीय कामगार परिषद मध्ये डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेले आजही त्यांना मान्य नाही. मग कामगार कर्मचाऱ्यांवर अन्याय अत्याचार होणारच !.

सुशिक्षीत व सुरक्षित नोकरी करणारे संघटीत असतात. म्हणून त्याच्या वर कोणी कधीच अन्याय, अत्याचार करीत नाही. तशी हिंम्मत कोणी ही करीत नाही. कुटूंबातील एक व्यक्ती सुशिक्षीत झाला तर त्याला सुरक्षीत नोकरी मिळते. नोकरी मिळाली की आर्थिक प्रश्न सुटतो. त्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक समस्यावर मात करता येते. असंघटित कष्टकरी गिरणी कामगारांना कामाचे तास नव्हते, आठवडयाची साप्ताहिक सुट्टी नव्हती. गिरणीत काम करताना गंभीर दुखापत झाली तर दवाखाण्याचा खर्च मिळत नव्हता. कामावर नाही तर पगार नाही. काम करून महिना झाला तरी कोणत्या तारखेला पगार मिळेल याची हमी नाही.या सर्व समस्यांवर असंघटित कष्टकरी गिरणी कामगाराचे नेते नारायण मेंघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांना संघटीत करून गिरणी मालक संघा विरोधी संघर्ष करीत होते. मालक दाद देत नव्हते. तेव्हा त्यांनी ५५०० गिरणी कामगारांच्या सहया घेऊन फँकटरी कमीशनचे अध्यक्ष डब्ल्यु.बी. मुलक यांच्याकडे १५ ऑक्टोबर १८८४ रोजी पिटीशन दाखल केले होते.त्याचे फळ सहा सात वर्षाच्या संघर्षा नंतर १० जून १८९० ला मिळाले. त्यावेळी गिरणी मालक संघाने जाहीर सभा घेऊन त्यात नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुचविलेल्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून मान्य केल्या. तेव्हापासून म्हणजे १० जून १८९० पासून सर्व सार्वजनिक सरकारी कार्यालयांना कंपन्यांना उपक्रमांना रविवार ही साप्ताहिक हक्काची सुट्टी मिळत आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार मंत्री असताना कामगार कायदयात तशी कायमची तरतुद करून ठेवली. पण त्याची अंमलबजावणी आजही कुठेच होताना दिसत नाही. मग इंटक, आयटक, सिटू, बीएमएस, एच एम पी. सारख्या राष्ट्रीय ट्रेड युनियन काय करतात? आजच्या अनेक सुशिक्षित व सुरक्षित नोकरी करणाऱ्यांना नोकरदारांना याची माहिती नसेल?. असे म्हणता येईल काय?. त्यांनाच काय त्यांच्या कामगार संघटना, युनियन चालविणाऱ्या नेत्यांना सुध्दा रविवारची सुटटीचे जनक हे असंघटित कष्टकरी गिरणी कामगारांना संघटीत करणारे सत्यशोधक चळवळीचे माळी समाजाचे कुशल संघटक व कुशल वक्ते रावबहादुर नारायण मेंघाजी लोखंडे होते हे माहित नसावे?. असले तरी त्यांची कधीच वाच्यता करायची नाही.म्हणजे नोंद न घेता कमी लेखने नाही काय?.

आज देशातील अंसघटीत कष्टकरी कामगार, मजूरांनी त्यांच्या संस्था संघटना, चालविणाऱ्यांनी नारायण मेघाजी लोखंडे यांच्यापासून प्रेरणा घेवून संघटीत शक्ती निर्माण करण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे.कामगाराच्या एकजुटीमुळे देशातील मोठयातमोठा भांडवलदार व उच्चवर्गीय प्रशासकीय अधिकारी संघटित शक्तीपुढेही झुकतो. हा इतिहास विशेष करून असंघटित कष्टकरी कामगार, शेतमजूर,नाका कामगार, घरकामगार व सर्व क्षेत्रातील कामगारांनी वाचला

पान ३ वर

**- सागर रामभाऊ तायडे**
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना
संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.

## राजाबाजार जैन मंदिराचा ४५ व्या वर्धापन दिवसानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चा ४५ वा वर्धापन दिन ९ फेब्रुवारी २०२४ शुक्रवार रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी सकाळी ८.०० वाजता सर्वप्रथम धर्म ध्वजारोहण होवुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात येणार आहे.तसेच ८.१५ वाजता भगवान शांतीनाथाचा पंचामुत अभिषेक होणार असुन दुपारी १ ते ५ दरम्यान शांती विधान होणार आहे.

संध्याकाळी ७ वाजता महाआरती नमोकार भक्ती मंडळाच्या साग्र सांगीता मध्ये महिला मंडळ राजाबजार च्या वतीने करण्यात येणार आहे. तसेच वर्धापन दिवसा निमीत्त प्रसादी वाटप धरमचंद, सुभाषचंद, मयुर, धिरज, चेतन, चिराग, पाटणी परिवार आडगांववाला, बालाजीनगर यांच्या वतीने देण्यात येणार आहे. वर्धापन दिवसाचे औचित्य साधुन महावीर डायग्नोस्टीक सेंटर यांच्या वतीने २ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान निशुल्क सर्व रोग निदान शिबीर व नेत्र तपासणी व चष्मा वितरण करण्यात येणार आहे.

वर्धापन दिनानिमीत्त मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात येणार आहे. पार्श्वनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात ९ फेब्रुवारी १९७९ रोजी भगवान शांतीनाथाची भव्य प्रतिमा मुनिश्री सिध्दसेन महाराजांच्या सानिध्यात प्रतिष्ठापित करण्यात आली होती. तेव्हापासुन औरंगाबाद येथील खंडेलवाल दिंगबर जैन समाजाची नेत्रदिपक प्रगती झाली. आज हा समाज आदर्श समाज म्हणुन ओळखला जातो. संपुर्ण भारतामध्ये औरंगाबाद येथील जैन समाजाची एक आगळी वेगळी प्रतिमा समोर येते. अशा या चमत्कारीक शांतीनाथ भगवंताच्या प्रतिमेचे दर्शन घेतांना मनामध्ये शांती व अलौकिक असा प्रकाश होतो, अशी या मंदिराची ख्याती आहे.

तरी समाज बांधवांनी वर्धापन दिवसाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहुन धर्मलाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्थ व कार्यकारणी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजपत्रित अधिकारी महासंघाचा ३८ वा वर्धापन दिन

# शासन आणि प्रशासन ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**मुंबई,** दि. ८ (प्रतिनिधी) – शासन आणि प्रशासन ही लोकशाही रथाची दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके समान वेगाने धावलीत की विकास वेगाने होतो. याचे उदाहरण राज्यात पहायला मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३८ व्या वर्धापन दिनानिमित्त वांद्रे येथे आयोजित कार्यक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कोकण विभागाचे आयुक्त महेंद्र कल्याणकर, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, राजेंद्र भोसले, महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, कोशाध्यक्ष नितीन काळे, कल्याण केंद्र समन्वयक श्री.टाव्हरे, सरचिटणीस समीर भाटकर आदी उपस्थित होते.

राज्याच्या कारभारात अधिकाऱ्यांचे मोठे योगदान असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, राज्याच्या कारभारात तुमचे काम महत्वाचे आहे. नियमांचे पालन करून अधिकारी काम करत असतात. काम नियमांमध्ये कसे करावे याचे चांगले ज्ञान अधिकारी वर्गाकडे आहे. अधिकारी हे शासनाचे अविभाज्य अंग आहे. राज्याचा गाडा हाकताना रथाची चाके आपण आहोतच. पण त्याचबरोबर या चाकांमध्ये वंगण घालण्याचे काम ही अधिकारी वर्ग करत असतो. शासन आणि प्रशासन यांनी केलेल्या चांगल्या कामामुळे राज्यात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचेही मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, शासन राज्यातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, महिला, ज्येष्ठ नागरिकांच्यासाठी अनेक योजना राबवत आहे. अनेक लोककल्याणकारी निर्णय घेत आहे. या योजना आणि निर्णय लोकांपर्यंत पोहचवण्याचे आणि त्याचा लाभ लोकांना देण्याचे काम प्रशासन करत आहे. सरकारची प्रतिमा निर्माण करण्याचे काम अधिकारी करत आहेत. लोकांच्या जीवनात चांगले दिवस येतील ही शासनाची भूमिका आहे. त्यासाठी योजनांची अंमलबजावणी अधिकारी करत असतात.

राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची उभारणी होत आहे. त्यामुळेच आज राज्यात परदेशी गुंतवणूकदार आकर्षित होत आहेत. गेल्या वर्षी दावोस येथे करण्यात आलेल्या सामंजस्य करारांपैकी ८० टक्के करार पूर्ण झाले आहेत. यंदा ३५३ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. उद्योगांसाठी पोषक वातावरण असलेले राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. देशात परकीय गुंतवणुकीत राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. जीडीपी मध्येही राज्याचा मोठा वाटा आहे. हे सर्व आपण अधिकाऱ्यांच्या जोरावर करत आहोत. लोकांच्या भल्यासाठी काम करणारे अधिकारी लोकप्रिय असतात, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले. अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख काम करावे असे सांगून मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त लोकांना भेटावे. जितके जास्त अधिकारी जनतेला भेटतील तितके चांगले काम होईल आणि माझ्याकडे येणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होईल.

**महासंघाच्या कल्याण केंद्रासाठी भरीव निधी देणार**

राजपत्रित अधिकारी महासंघाच्या अनेक मागण्या आहेत. या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून त्या पूर्ण होतील. महासंघ कल्याण केंद्रासाठी निधी दिला जाईल. जुन्या निवृत्ती वेतन योजनेबाबत येत्या अधिवेशनात सकारात्मक निर्णय घेतला जाईल असेही मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले.

प्रास्ताविकात महासंघाचे अध्यक्ष श्री. देसाई यांनी महासंघाच्या कामाचा आढावा घेतला. तसेच आतापर्यंत केलेल्या मागण्या मान्य केल्या बद्दल मुख्यमंत्री श्री शिंदे यांचे आभार व्यक्त केले. आभार श्री. काळे यांनी व्यक्त केले तर सूत्र संचालन मीनल जोगळेकर यांनी केले.

# आकांक्षित जिल्ह्यांसाठी प्रधानमंत्री गतिशक्ती जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आज आयोजन

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – उद्योग संवर्धन एवं आंतरिक व्यापार विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पश्चिम विभागातील महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या ३ राज्यातील ११ आकांक्षित जिल्ह्यांसाठी महाराष्ट्र (४), गुजरात (२) आणि राजस्थान (५). दि.९ फेब्रुवारी, २०२४ रोजी यशदा, पुणे, येथे दुसऱ्या प्रधानमंत्री गतिशक्ती जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले असल्याचे नियोजन विभागाने कळविले आहे.

राज्यातील नंदुरबार, वाशीम, धाराशिव, गडचिरोली या चार जिल्ह्यांचा आकांक्षित जिल्हा म्हणून समावेश आहे.

९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या एक दिवसीय कार्यशाळेचे सकाळी दहा वाजता उद्घाटन करण्यात येईल. कार्यशाळेत विशेष सचिव (लॉजिस्टिक्स) प्रधानमंत्री गती शक्ती बाबत सादरीकरण आणि व्हीडिओ प्रसारित करण्यात येईल.

'पीएम नॅशनल मास्टर प्लॅन फॉर एरिया डेव्हलपमेंट प्लॅनिंगवर जिल्हाधिकाऱ्यांसाठी हॅण्डबुक' या विषयावर सादरीकरण तसेच पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनवरील भूमिका आणि जबाबदाऱ्यांच्या संकलनावर सादरीकरण केले जाईल. तसेच पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्राच्या नियोजनाच्या सर्वांगीण नियोजनात गतीशक्ती प्रधानमंत्री प्रात्यक्षिक तसेच पीएम गतिशक्तीमध्ये क्षेत्र विकास दृष्टिकोनाचा अवलंब करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले जाईल.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात यशोगाथा सादरीकरण होईल. यामध्ये एपएमपी/एसएमपी (NMP/SMP) प्लॅटफॉर्मचे सादरीकरण – (BISAG-N) द्वारे, उपयुक्तता आणि पायाभूत सुविधा मंत्रालये/विभागांद्वारे सादरीकरण, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय (MoRTH दूरसंचार विभाग (DoT) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय (MoPNG), सामाजिक क्षेत्रातील मंत्रालये/विभागांद्वारे सादरीकरण, उच्च शिक्षण विभाग, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग आदिवासी व्यवहार मंत्रालय, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय यांच्या द्वारा सादरीकरण करण्यात येईल. क्षेत्र विकास दृष्टिकोन अंगीकारण्यावर प्रात्यक्षिक, क्षेत्र विकासावर या कार्यशाळेत सादरीकरण केले जाईल.

## ४४ व्या वार्षिक पुष्प प्रदर्शन शनिवारी

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – उपवने व उद्याने, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागामार्फत ४४ व्या वार्षिक पुषपप्रदर्शनाचा उद्‌घाटन समारंभ शनिवार , दि.१० रोजी सकाळी साडेअकरा वा. विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी मुख्य अभियंता श्रीनिवास रं.कातकडे, अधीक्षक अभियंता सा.बा.मंडळ विवेक बडे राहणार आहे.

अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ सुंदरदास भगत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बक्षीस वितरण सायंकाळी साडेपाच वा. होणार आहे. प्रदर्शन जुने उच्च न्यायालय परिसर, अदालत रोड येथे होणार आहे. उपस्थितीचे आवाहन सहाय्यक संचालक जगन्नाथ चौगुले, संचालक उपवने व उद्याने विजय रावळ यांनी केले आहे. पुष्प प्रदर्शन सर्वांना विनामुल्य पाहता येणार आहे.

## इतिहास घडविणारे कामगार नेते रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे

**पान २ वरून**

पाहिजे. कारण देशात सर्वांत जास्त देशात ९३ टक्के असंघटीत कष्टकरी कामगार आहेत. त्यांनी १० जून १८९० हा असंघटित कष्टकरी कामगाराचा पहिला विजय दिवस म्हणून साजरा केला पाहिजे.

महात्मा ज्योतीराव फुले यांची सत्यशोधक चळवळ ही देशातील तमाम ब्राम्हणेत्तर म्हणजे आजचे बहुजन, आदिवासी, मागासवर्गीय जाती जमातीतील कष्टकरी समाजाकरीता होती सर्व समाजाचे नेते विसरले आहेत. विशेष आंबेडकरी चळवळीतील बुध्दीजीवी साहित्यिक, कामगार नेते बहुजन, आदिवासी, भटक्यांना मागासवर्गीयांना कामगार मानत नाही. फक्त त्याची जात पाहतात.कामगार संघटना बांधताना त्यांना विशिष्ट विचारधारा पाहिजे. त्या शिवाय कामगारांना संघटीत करता येत नाही. कामगार म्हणून त्यांचे प्रश्न, समस्या, जाणून न घेता त्याची जात पाहून संघटना बांधू पाहणारे नेते न्याय मिळवून देतील काय? म्हणून आंबेडकरी चळवळीची विचारांची केंद्रस्थानी एकही संघटना मान्यताप्राप्त होऊ शकली नाही. ज्या असोसिएशन आहेत त्याचेही वैचारीक पातळीवर एकमत नाही. सर्व क्षेत्रातील संघटीत कामगारांची ही स्थिती असेल तर असंघटीत कामगारांची काय परिस्थिती असेल?. आजपर्यंत संघटीत कामगरांनी असंघटीत कामगारांना कामगार म्हणून पाहिले नाही. जो असंघटित कामगार नेहमीत काम नसल्यामुळे वार्षिक वर्गणी भरू शकत नाही तो आपली संघटना कसा चालवत असतील ?. त्याचे नेते बनण्याचे कोण धाडस करले? हे आज आपण पाहतो. ते धाडस नारायण मेंघाजी लोखंडे यांनी त्याकाळी केले.आज कष्टकरी कामगारांना अन्न,वस्त्र,निवारा,रोजगार,शिक्षण आणि आरोग्य हया माणसाच्या सहा मुलभूत गरजा भागविताना बहुजन समाजाचे खुप मोठया प्रमाणात शोषण होत आहे.या सर्व शोषित पिडीत समाज घटकाला संघटीत करून न्याय हक्क व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महात्मा ज्योतीराव फुले यांचे सर्वोत्तमष्ठ शिष्य नारायण मेंघाजी लोखंडे अहोरात्र झगडत होते.ती सत्यशोधकाची चळवळ अनेक अंगाने देशातील कानाकोपऱ्यात पोहचली आहे.

गिरणी कामगारांना रविवार सुट्टी मिळू नये यासाठी गिरणी मालकांनी या देशातील भटा ब्राम्हणंना उच्चवर्णीयातील बुध्दीजींवीना कामगारात बुध्दीभेद करण्याच्या कामावर लावले होते.त्यानुसार गिरणी कामगारांना रविवार हा ख्रिश्चन धर्मियांचा दिवस आहे. त्यामुळे हिंदू असलेल्या गिरणी कामगारात चुकीचा प्रचार व प्रसार चालला होता. तेव्हा सरकार पुढे मोठा पेच निर्माण झाला होता.तेव्हा सरकारने बॉम्बे मिल हँडस मिल असोशिएनचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे यांना रविवार हा सुट्टीचा दिवस ठेवण्यामागची भक्कम कारणे व आवश्यकता याबाबत मत विचारले होते. सत्यशोधक चळवळीत काम करणारे लढाऊ नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी रविवार हा केवळ ख्रिश्चन धर्मियाचा दिवस नाही तर तो हिंदूचा ही धार्मिक दिवस आहे याचे ठोस पुरावे म्हणजे बहुजन समाजातील प्रसिध्द कुळ दैवत खंडोबा व कुलस्वामिनी या देवताचा रविवार हाच दिवस मानला जातो.

बहुसंख्य गिरणी कामगार हे खंडोबाचे भक्त आहेत. परंतु केवळ या कारणाकरीता म्हणून रविवार संबध नाही. कारण भारतात ही चाल फार पुर्वीपासून आहे. ब्रिटीश प्रशासनाने सुरवाती पासून सर्व समाजाला सर्व वर्गाना, सर्व धर्मियाना सोयीचा सुट्टीचा दिवस म्हणून रविवार मानला असल्याने तोच दिवस कामगाराना सुट्टीचा दिवस असावा असे ठासून सांगितले. कार्यालयीन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रविवार सुट्टी तर कष्टकरी कामगारांना वेगवेगळया दिवशी सुट्टी.आजही आपल्या देशातील कंपन्या कारखाने व इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गाला खात्याचे मालक आपल्या सोईने कामगार मजुरांना सुट्टी देतात.असंघटीत कष्टकरी कामगारांना तर हक्कांची सुट्टी नाही. ज्या दिवशी काम नसेल तोच त्याचा सुट्टीचा दिवस.आता पुन्हा १८८० सारखी परिस्थिती संघटीत असंघटीत कामगारांची होत आहे.याला केवळ राष्ट्रीय ट्रेड युनियन जबाबदार नाहीत. तर तो सर्व जाती धर्माचा कामगार कर्मचारी जो स्वतःला बहुजन,मागासवर्गीय समाज म्हणुन फक्त राजकीय आरक्षण घेण्यासाठी राजकीय पक्षाची गुलामी पत्करतो. पण पक्षाची ट्रेड युनियनची वैचारिक मांडणी, विचारधारा पाहत नाही. म्हणुन महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्य शोधणारी,सांगणारी व अंमलबजावणी करण्या करीता संघर्ष करणारी चळवळ उभी केली होती तीच स्विकारली पाहिजे होती.पण ती विस्कळीत का झाली.त्यांचे आत्मचिंतन करून काम केले.तर भारतातील बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय कामगार कर्मचारी यांचे भविष्य उज्वल राहील. ज्यानी भारतात पहिली असंघटीत संघटीत कामगारांची संघटना काढून संघर्ष केला. इतिहास घडविणारे कामगार नेते भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादुर 'नारायण मेघाजी लोखंडे' या थोर कामगार नेत्याच्या महान कार्यास, आजच्या (९ फेब्रुवारी) स्मृतिदिनी कोटी कोटी प्रणाम !!!.

# शेकडो भाविकांनी घेतले भगवान संभवनाथांचे दर्शन वर्धापन दिवसाचे औचित्य साधुन भव्य शोभायात्रा संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – श्री.१००८ संभवनाथ दिगंबर जैन मंदिर बजाजनगर पंढरपुर मंदिराच्या १२ व्या वर्धापन दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक ४ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प.पु.आचार्य हेमसागरजी महाराज व आचार्य सुविसागरजी महाराज यांच्या मंगल प्रेरणा व आर्शिवादाने हा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. सर्व प्रथम सकाळी ७ वाजता भगवंताची भव्य शोभायात्रा, काढण्यात आली. शोभायात्रेमध्ये महिलांनी डोक्यावर मंगल कळस घेतले होते.या शोभायात्रेत डोक्यावर मंगळ कलश घेण्याचा मान सौ.शितल प्रमोद बाकलीवाल यांना मिळाला व केशरी व लाल रंगाच्या साडया परिधार केल्या होत्या व भगवंताचा जय जय कार करत होते. तदनंतर सकाळी ८ वाजता कल्याणमल संदीप, योगेश कासलीवाल परिवार आडुळवाला यांच्या वतीने धर्मध्वजारोहन होऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तदनंतर ८.३० वाजता भगवान संभवनाथांचा व मानसस्तंभाचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान योगीता महावीर पांडे यांना मिळाला. यावेळी प्रथम अभिषेकाचा मान वंदना राजेंद्र काला यांना मिळाला तर दुग्ध अभिषेकाचा मान पियुष अक्षय दिलीप चुडीवाल यांना मिळाला तर सर्व औषधीचा मान दिवाकर साहुजी यांना मिळाला तर भगवांताचा शांतीमंत्र करण्याचा मान वंदना सुनिल पांडे व वंदना जितेंद्र ठोले यांना मिळाला. घी अभिषेकाचा मान शर्मिला मनोज कासलीवाल यांना मिळाला तर अर्चना फळ चढविण्याचा मान सपना सुनिल साहिल गंगवाल यांना मिळाला. तर संध्याकाळचा आरतीचा मान अभिषेक पांडे, अल्केश लोहाडे, स्वप्नील कासलीवाल यांना मिळाला. तसेच इंद्र म्हणुन डॉ. वंदना राजेंद्र काला, प्रिती सुजीत गोधा, सोनल सचिन पाटणी, पुजा अतुल चुडीवाल, सपना सुदेश अजमेरा, समता तुषार साहुजी यांनी सुध्दा भगवांताचा अभिषेक केला.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, जिल्हा सरचिटणीस अनिल चोरडिया, यांची प्रमुख उपस्थिती होती व मंदिरातर्फे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष राजेंद्र काला व सचिव सुजित गोधा व अतुल चुडीवाल, सुदेश अजमेरा, योगेश कासलीवाल, महावीर पांडे, सचिन पाटणी, दिपक काला, सुनिल पांडे, जीवन गंगवाल आदींनी केले.

यावेळी उपस्थित भाविकांना अनिता महावीर संकेत कासलीवाल परिवार खराडीवाला व संतोष मनोज स्वप्नील अक्षद कासलीवाल परिवार बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ.राजेंद्र काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पांडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल, सल्लागार डॉ.सुरेश बडजाते, रविंद्र ठोले संदिप बाकलीवाल व सकल जैन समाज बजाजनगर पंढरपुर, वाळुज, सिडको महानगर १ यांनी केले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# परीक्षेला जाणाऱ्या भावंडांवर काळाचा घाला

## हायवाखाली चिरडून बहिणीसह २ भावांचा करुण अंत, ओव्हरटेक करण्याच्या नादात धडक

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- दोन हायवांनी ओव्हरटेक करण्याच्या स्पर्धेत दुचाकीस्वारांना चिरडले. यात तिघे बहिण -भाऊ जागीच ठार झाले. हा भीषण अपघात बीड बायपासवरील बाळापूर फाटा परिसरातील पाटीलवाडा हॉटेलसमोर गुरुवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडला.

मृत तिघेही बहीण -भाऊ परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिस निरीक्षक दरवाडे यांनी दिली. अपघातानंतर हायवा चालक घटनास्थळावरून गाडीसह फरार झाला. अपघातात



मृत्यूमुखी पडलेले तिघेजण परभणी जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

प्रवीण अंभोरे, प्रतिभा अंभोरे आणि लखन अंभोरे अशी मृतांची नावे आहेत. ते वीस ते पंचवीस वर्षे वयोगटातील होते. त्यांच्याजवळ वन विभागाच्या परीक्षेचे हॉलतिकीट सापडले. यावरून ते परीक्षा देण्यासाठी जात असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला.

अपघात इतका भीषण होता की घटनास्थळीच तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. रस्त्यावर तिघांचे मृतदेह पडले होते तर रक्तामांसाचा चिखल झाला होता. या घटनेनंतर रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. काही काळ वाहतुकीची कोंडीही झाली. मागील काही दिवसांपासून ते सातारा परिसरातील शिवछत्रपतीनगर भागात राहत होते, अशी ही माहिती समोर आली आहे.

अपघाताची माहिती मिळाल्यावर चिकलठाणा पोलिस तत्काळ घटनास्थळी गेले. त्यांनी तिन्ही मृतदेह घाटीत पाठवले आहेत. याप्रकरणी चिकलठाणा पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

# जिल्हा स्तरावर हॅकथॉन स्पर्धेत प्रथम आलेल्या विद्यार्थी व शिक्षिकेचा सत्कार




वैजापूर दि.८ (प्रतिनिधी)- औरंगाबाद जिल्ह्यात पीएमश्री म्हणून पालिकेच्या मौलाना आझाद या एकमेव विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अमेझॉन व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित औरंगाबाद येथील कॉम्प्युटर कोडिंग हॅकथॉन स्पर्धा प्रथम क्रमांकानी जिंकली व जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला त्या प्रित्यर्थ विद्यार्थी साई वैभव काळे, हर्ष दिवेकर, तुषार शेलार सर्व वर्ग ८ वा व मार्गदर्शक शिक्षिका सुवर्णा बोर्डे यांचा भाजपा चे शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, उपाध्यक्ष प्रेम राजपूत,शैलेश पोंदे,व राजेश गायकवाड यांनी त्यांचा सत्कार केला कार्यक्रम अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका नीता पाटील होत्या तर प्रमुख उपस्थिती माजी शिक्षणाधिकारी धोंडिरामसिंह राजपूत व पर्यवेक्षक एम.आर.गणवीर यांची होती या विद्यार्थ्यांना एक एलईडी टीव्ही,नगदी रोख बक्षीस, व संगणकीय साहित्य जिंकून राज्यस्तरावर त्यांची निवड झाली. येथील पालिकेच्या मौ.आ.विद्यालयात त्यांचा बुधवार (ता.०७)रोजी त्यांचा गौरव करण्यात आला.

# राज्यात विदर्भ, मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या तापमानात वाढ झाली आहे. दुपारी उन्हाचा चटका वाढला आहे. अनेक ठिकाणी पारा २० अंशांच्या पुढे गेला आहे. मात्र उद्यापासून राज्यात पावसाला पोषक हवामान तयार होणार असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यात आजपासून ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. तर ९ फेब्रुवारीला हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पूर्व विदर्भापासून तेलंगण, कर्नाटकपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाला पोषक हवामान तयार होत आहे. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये मात्र आकाश निरभ्र राहून दुपारच्या वेळी उन्हाचा दाह अधिक जाणवण्याची चिन्हं आहेत.

(पान १ वरुन)

## ठाकरे गटाचे अभिषेक घोसाळकरांची गोळ्या घालून हत्या

दहिसरमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरु असतांना काही वेळातच त्यांची प्राणज्योत मालावली.

घोसाळकर यांच्यावर गोळ्या झाडणारा मॉरिस नावाचा हा इसम दहिसर- बोरिवली परिसरात स्वयंसेवी संघटना चालवत असल्याची माहिती आली आहे. स्थानिक राजकीय वर्तुळात मॉरिस नावाच्या व्यक्तीला स्वयंघोषित नेता म्हणून ओळखले जायचे. गणपत पाटील नगरमध्ये मॉरिस काम करत होता. हा गोळीबार पैशाच्या व्यवहारातून केला असल्याचे समोर आले आहे. वर्षभरापूर्वी त्यांच्यामध्ये वाद झाला होता. पण आता तो मिटल्याने ते एकत्र आले होते. मॉरिसने अभिषेक घोसाळकरांना गोळ्या घालत नंतर स्वतःवरही गोळी झाडून घेतली. यामध्ये मॉरिस नावाच्या व्यक्तीचाही जागीच मृत्यू झाला.

मॉरिस नावाच्या व्यक्तीने घोसाळकरांना त्याच्या कार्यालयात बोलावलं होतं. त्यानंतर या दोघांनीही फेसबुक लाईव्ह केले आणि यापुढे एकत्र काम करण्याचे ठरवले. शेवटच्या क्षणी मॉरिस नोरवा हा व्हिडीओतून बाजूला झाला आणि त्याने समोरून गोळीबार केला. त्यात अभिषेक घोसाळकर जागेवर कोसळले.

## ...म्हणून राजीनामा दिल्याचे जाहीर केले; भुजबळांचा खुलासा

सांगू नका. म्हणून मी पावणे तीन महिने काहीच बोललो नाही.

विरोधकांनी टीका केली की मंत्रिमंडळात बसता आणि सरकारविरोधात बोलता. विरोधकांच्या या टीकेवर मी गप्प बसलो. पण सरकार पक्षातील एक आमदार म्हणाला की भुजबळला लाथ मारून बाहेर काढा. लाथा मारायची भाषा ऐकली तेव्हा मी म्हणालो की राजीनामा दिल्याचं आता नाही सांगणार तर कधी सांगणार? सरकारमधील आमदार म्हणत होते की यांना लाथाडा आणि बाहेर काढा आणि मी काही बोललो नसतो तर म्हणाले असते किती बेशरम माणूस आहे की खुर्चीला चिकटून बसला आहे. कोणी मला लाथ मारण्याची गरज नाही. त्यामुळे मी म्हणालो की राजीनामा दिला आहे, जा जाऊन तो स्वीकारा, असे छगन भुजबळ म्हणाले.

## ठाकरे गटाचे रवींद्र वायकर शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार

गळाला लागल्याची चर्चा होती. या आमदाराने एकनाथ शिंदे यांची गुप्तपणे भेट घेतल्याचीही चर्चा होती. मात्र, हा आमदार नेमका कोण, हे समजू शकले नव्हते. मात्र, आता आमदार रवींद्र वायकर असल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वी ईडीने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणात रवींद्र वायकर यांची चौकशी केली होती. गेल्या महिन्यात रवींद्र वायकर यांच्या घरावर ईडीने धाडही टाकली होती. त्यानंतर आता रवींद्र वायकर आता शिंदे गटात प्रवेश करतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. रवींद्र वायकर यांच्यासोबत स्थानिक शिवसैनिकही शिंदे गटात जाण्याची शक्यता आहे. वायकर यांनी सर्व नगरसेवक, शाखा प्रमुख, विभाग प्रमुखांना तयारीत राहण्याचे आदेश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## मला मंडल आयोगाला चॅलेंज करायचं नाही,...

की, नाशिक हा भुजबळांचा बालेकिल्ला आहे असं कोण म्हणतं? त्याचा काय संबंध? सर्व जातींचा हा बालेकिल्ला आहे. सरकारमध्ये बदल होत नाही, जनताच तो बदल करते. आम्ही आमच्या मागण्यांसाठी देवीच्या दर्शनाला आशीर्वाद घ्यायला येतो. भुजबळ, तू पुन्हा पुन्हा चिथावणी देऊ नको. तुझ्यासहित सगळं बाहेर काढतो. मला चॅलेंज देऊ नको, मी पाटील आहे म्हणूनच ओबीसीत जाऊन दाखवले.

## नरेंद्र मोदी जन्माने ओबीसी नाहीत, राहुल गांधी यांचा दावा

जन्मला आले. आपल्या सर्वांना भयंकर बेवकूफ, मूर्ख बनवलं जात आहे. तेली जातीला भाजपने २००० साली ओबीसीमध्ये समाविष्ट केलं. त्यामुळे मोदी हे जन्माने ओबीसी नाहीत. तरीही ते खोटं बोलून आपण जन्मजात ओबीसी असल्याचं सांगत आहेत. मला सर्टिफिकेटची काहीही गरज नाही. मला माहिती आहे ते ओबीसी नाहीत. ते कोणत्याही ओबीसीची गळाभेट घेत नाहीत. ते कोणत्याही शेतकऱ्याचा हात हातात घेत नाहीत, कोणत्या मजुराला हात लावत नाहीत. ते केवळ अदानींचा हात पकडतात. मोदी कधीही जातनिहाय गणना करु देणार नाहीत, हे मी लिहून देतो. जातीय गणना फक्त आणि फक्त राहुल गांधी आणि काँग्रेसच करु शकते असे त्यांनी म्हटले.

## पक्ष चोराचोरीत दंग असलेल्या महायुती सरकारला...

फेऱ्यातून मुक्ती मिळावी, याच उद्देशाने ते फुटले आहेत. स्वत:चं पाक्षालन करण्यासाठी फुटले आहेत. अशा व्यक्तींकडून काय अपेक्षा ठेवायची ? असा सवाल वडेट्टीवार यांनी विचारला. ते ( बाबा सिद्दीकी) धर्मांध पक्षात जात आहेत. ते अजित पवार यांच्या पक्षात जात असले तरी ते (अजित पवार) भाजपच्या इशाऱ्यावर चालणारे बाहुले आहेत, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

## राज्यसभेसाठी भाजपच्या नेत्यांच्या नावाची यादी...

आली आहे. त्यामुळे राज्यातून भाजपकडून राज्यसभेसाठी कुणाला उमेदवारी मिळणार याचा अंतिम निर्णय दिल्लीत होणार आहे.

भाजपकडून दिल्लीला पाठवण्यात आलेल्या यादीत नारायण राणे, विनोद तावडे, पंकजा मुंडे, विजया राहटकर, अमरीश पटेल, माधव भंडारी, चित्रा वाघ, हर्षवर्धन पाटील आणि संजय उपाध्याय यांचे नावं आहेत. त्यामुळे या नऊ नेत्यांपैकी कोणाच्या गळ्यात राज्यसभेच्या उमेदवारीची माळ पडणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे.

# महिला व बालविकास विभागाची सर्वसमावेशक बैठक

## कोविडमुळे पालक गमावलेल्या ११५ बालकांना लाभ देण्यास मान्यता

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- कोविड १९ कालावधीत एक अथवा दोघेही पालक गमावलेल्या बालकांच्या शैक्षणिक तसेच अन्य खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी १० हजार रुपयांचा लाभ ११५ पात्र बालकांना देण्यास जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या सर्वसमावेशक बैठकीत मान्यता देण्यात आली.

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत सर्व समावेशक समितीचे बैठकीचं आयोजन बुधवारी (दि.७) करण्यात आले होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती जाधव, बालकल्याण समिती अध्यक्ष श्रीमती. आशा शेरखाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती सुवर्णा जाधव, जिल्हा परीविक्षा अधिकारी डी एल राठोड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, जिल्हा संरक्षण अधिकारी श्रीमती वर्षा शेळके तसेच पोलीस विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ, समाज कल्याण विभाग,म.न.पा. महिला व बाल विकास विभाग, जिल्हा उद्योग केंद्र व अशासकीय सदस्य आदी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या समन्वयाने कोविड १९ मुळे एक वा दोन्ही पालक दगावलेल्या ११५ बालकांना शैक्षणिक साहित्य शालेय व वसतीगृह शुल्क इत्यादी करिता पात्र बालकांना १० हजार रुपये पर्यंतचा लाभ देण्यास जिल्हा कृती दलाने मान्यता दिली.

तसेच प्रायोजकत्व आणि प्रतिपालकत्व मंजुरी समितीमार्फत २९२ बालकांना लाभ देण्यास समितीने मान्यता प्रदान केली. तसेच भिक्षा मागणाऱ्या ८ व ३ बाल कामगारांना असे एकूण ११ बालकांना बालगृहामध्ये प्रवेशित करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच जिल्ह्यात ४३ बालविवाह रोखण्यात आल्या व दोन प्रकरणात पालकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण कक्ष चाईल्ड लाईन व संबंधित पोलीस स्टेशनला प्रोत्साहन पत्र देण्याची व स्वयंसेवी संस्था व लोकसहभागातून काम अधिक परिणाम करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली. मुलींचे बालगृह क्षमता पूर्ण झाली असल्याने मुलीचे नवीन बालगृह सुरू करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

# छत्रपती संभाजीनगरात भरणार शिक्षकांचा मेळा

## १० फेब्रुवारी रोजी पहिले शिक्षक साहित्य संमेलन, ४०० हून अधिक शिक्षकांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे १० फेब्रुवारी रोजी पहिले शिक्षक साहित्य संमेलन भरणार आहे. या साहित्य संमेलनाचे उद्घाटन कवी तथा संमेलनाध्यक्ष डॉक्टर हबीब भंडारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या हस्ते होणार आहे. शिक्षकांची साहित्य प्रतिभा, कला व त्यांना व्यासपीठ मिळावे म्हणून हे शिक्षक साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

शाळांमध्ये अनेक गुणी साहित्यिक, कवी, कलावंत शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांच्या भाषा, कला विकासात तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासात त्यांचे महत्त्वाचे योगदान असते. त्यामुळे त्यांच्या साहित्य प्रतिभेला वाव मिळावा असा या संमेलनाचा हेतू आहे. छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षकांनी शिक्षकांसाठी भरवण्यात येणारे हे जिल्ह्यातील पहिलेच शिक्षक साहित्य संमेलन ठरणार आहे. त्यात जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये येथे कार्यरत असणारे शिक्षक यात सहभागी होणार आहेत. या संमेलनात सामान्यतः ४०० हून अधिक शिक्षक सहभागी होणार आहेत.

या शिक्षक साहित्य संमेलनात कथाकथन, कविसंमेलन, परिसंवाद आणि चित्रप्रदर्शन यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण विभाग जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने छत्रपती संभाजीनगर येथे येत्या १० फेब्रुवारी रोजी पहिले शिक्षक साहित्य संमेलन प्रसिद्ध शिक्षक कवी, लेखक, गीतकार डॉ. हबीब भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे, अशी माहिती ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी दिलीप सिरसाठ आणि रमेश ठाकूर यांनी दिली.

शनिवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळात हे संमेलन अग्रसेन विद्यामंदिर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण उपसंचालक अनिल साबळे या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने होईल. त्यानंतर प्राचार्य रवींद्र तोरवणे यांच्या हस्ते ४० हून अधिक शिक्षक कलावंतांच्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन होईल. ययाच कार्यक्रमात १३८ हून अधिक शिक्षक कवींच्या कवितांचा समावेश असलेला 'काव्यदिंडी' हा संपादित कवितासंग्रह मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित केला जाणार आहे. त्यानंतर ज्येष्ठ कवी प्रा. श्रीधर नांदेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होईल त्यात ५६ हून अधिक शिक्षक कवी सहभागी होतील.

# बाबा सिद्दीकी यांची काँग्रेसला सोडचिठ्ठी

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- आज मुंबई काँग्रेसचे बडे नेते बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. काँग्रेस पक्षात ते मागच्या ४८ वर्षांपासून कार्यरत होते. एक पोस्ट लिहून त्यांनी राजीनामा दिल्याचं जाहीर केलं. बाबा सिद्दीकी हे मुंबई काँग्रेसमधलं एक बडं नाव आहे. त्यांनी काँग्रेस पक्ष सोडणं हा लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर एक धक्का मानला जातो आहे. तुम्ही अजित पवारांबरोबर जाणार का? या प्रश्नाचं तसंच काँग्रेस पक्ष का सोडला याचं उत्तर बाबा सिद्दीकींनी आता दिलं आहे.

१० तारखेला मी माझी भूमिका स्पष्ट करणार आहे. एका छोट्या सभेत मी सांगणार आहे की काय घडलं. मी आता निर्णय घेतला आहे. मला कुणी थांबवण्याचे प्रयत्न केले ते मी सांगणार नाही. मला काही गोष्टी समजल्याच नाही. मी काही गोष्टी सांगितल्या होत्या त्यानंतरही काही गोष्टी घडल्या नाहीत. त्यामुळे मी ठरवलं की आपण लांब गेलेलं बरं. प्रत्येक समाजाला घेऊन जाण्याचं काम आजच्या घडीला अजित पवार करत आहेत. मात्र मी १० तारखेला माझी भूमिका स्पष्ट करेन. काँग्रेसमध्ये काय गोष्टी घडल्या त्याबद्दल मौन बाळगलेलं बरं. पण मला न पटणाऱ्या त्या होत्या. मला अनेकांनी थांबवण्याचा प्रयत्न केला. पण मी माझा निर्णय पक्षश्रेष्ठींना १५ दिवसांपूर्वीच कळवला होता.' असं बाबा सिद्दीकी म्हणाले आहेत.

# भारत-म्यानमार यांच्यातील 'मुक्त संचार व्यवस्था' करार रद्द

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने भारत सरकारने काही दिवसांपूर्वी मोठा निर्णय घेतला. त्यानुसार, भारत-म्यानमारच्या सीमेवर तब्बल १६४३ किमीचं कुंपण घालण्यात येणार आहे. आता त्याही पुढे जाऊन सरकारने आणखी एक निर्णय घेतला आहे. त्यानुसार, फ्री मुव्हमेंट रिजीम अर्थात 'मुक्त संचार व्यवस्था' करार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## कार्यालय नगर परिषद वैजापूर, जि.छ. संभाजी नगर

दुरध्वनी क्र. ०२४३६-२२३१४५/
E-Mail ID: npvaijapur@gmail.com/
coud.vaijapur@maharashtra.gov.in

जा.क्र./न.प.वै/कावि-४/२०२४/२४५ दिनांक:०८/०२/२०२४

### जाहीर ई-लिलाव सूचना

वैजापूर नगर परिषद जिल्हा छत्रपती संभाजीनगर हद्दीमध्ये असणाऱ्या आठवडी बाजार जमीन भाडे व भाजी मंडई जमीन भाडे फी वसुली जाहीर ई- लिलाव सूचना मर्यादा कालावधी १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालवधी पर्यंतचा जाहीर ई-लिलाव प्रगटन.

वैजापूर नगर परिषद जिल्हा छत्रपती संभाजीनगर हद्दीमध्ये असणाऱ्या आठवडी बाजार जमीन भाडे भाजी मंडई जमीन भाडे वसुली लिलाव दि. ०९/०२/२०२४ ते दि. १५/०२/२०२४ पर्यंत मागण्यात येत आहे. त्याचा तपशील खलील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | ई-लिलावाचा प्रकार | शासकीय बोली | निविदा फी | अनामत रक्कम | ई-लिलाव ऑनलाईन दाखल करणे दिनांक | ई-लिलाव दस्ताएवाजाची तपासणी (Approval) | ई-लिलाव दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भाजी मंडई जमीन भाडे वसुली | ७०००००/- | १०००/- | २५०००/- | ०९/०२/२०२४ ते १५/०२/२०२४ | १६/०२/२०२४ | २०/०२/२०२४ | सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत |
| २ | आठवडे बाजार जमीन भाडे वसुली | ५०००००/- | १०००/- | २५०००/- | ०९/०२/२०२४ ते १५/०२/२०२४ | १६/०२/२०२४ | २०/०२/२०२४ | सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत |

टीप - लिलावाच्या अटी व शर्ती न.प. कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वा. वेळात श्री.एम.एन.साळवे यांचेकडे तसेच नोटीस बोर्डवर पाहावयास मिळेल.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वैजापूर